मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482




# जगतापांना खनिज प्रतिष्ठानची जबाबदारी!

## आमदार शंकर जगताप यांची जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेवर नियुक्ती!

» पिंपरी | प्रतिनिधी

**चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांची जिल्हा खनिज प्रतिष्ठान (DMF), पुणेच्या नियामक परिषदेवर पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे अधिकृत पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाच्या खनिकर्म शाखेने जारी केले आहे.**



महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने ५ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार तसेच ११ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या अधिसूचनेतील तरतुदींनुसार आमदार शंकर जगताप यांची जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणेच्या नियामक परिषदेवर पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. खनिज उत्खननामुळे बाधित होणाऱ्या परिसरातील नागरिकांच्या विकासासाठी उपलब्ध होणाऱ्या निधीचा योग्य विनियोग करण्याच्या दृष्टीने या परिषदेची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे आमदार जगताप यांच्यावर आता खनिजबाधित भागातील विकासकामांना दिशा देण्याची महत्त्वाची जबाबदारी असणार आहे.

जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून खाणकामामुळे प्रभावित झालेल्या भागांमध्ये पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन तसेच नागरिकांच्या जीवनमानाशी संबंधित विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. या निधीचा प्राधान्यक्रम निश्चित करणे आणि त्याचा प्रभावीपणे वापर होण्यासाठी नियोजन करणे, ही नियामक परिषदेची प्रमुख जबाबदारी आहे. विशेषतः खनिजबाधित भागातील नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन विकासकामांना प्राधान्य देणे आणि मंजूर निधीचा पारदर्शकपणे वापर होतो आहे की नाही, यावर देखरेख ठेवणे आवश्यक असते.

नियामक परिषदेकडून जिल्हा खनिज प्रतिष्ठानचा वार्षिक कृती आराखडा आणि अर्थसंकल्प मंजूर केला जातो. तसेच विविध विकासकामांच्या प्रस्तावांना मान्यता देणे, मंजूर प्रकल्पांच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेणे, निधीचा योग्य वापर होत असल्याची खात्री करणे, आवश्यक त्या ठिकाणी सुधारणा सुचविणे आणि विकासकामांच्या परिणामकारकतेचे परीक्षण करणे, अशी महत्त्वपूर्ण कामे परिषदेकडून केली जातात. याशिवाय प्रतिष्ठानचा वार्षिक अहवाल तसेच लेखापरीक्षित खात्यांना मंजुरी देण्याची जबाबदारीही नियामक परिषदेवर असते.

या पार्श्वभूमीवर आमदार शंकर जगताप यांची झालेली नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात आहे. खनिजबाधित भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच निधीचा परिणामकारक वापर करून विकासकामांना गती देण्याची संधी या माध्यमातून मिळणार आहे. विशेषतः आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, पर्यावरण आणि स्थानिक पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> “जिल्हा खनिज प्रतिष्ठान पुणेच्या नियामक परिषदेवर पदसिद्ध सदस्य म्हणून मिळालेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. खनिजबाधित भागातील नागरिकांच्या मूलभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण संवर्धनासाठी उपलब्ध निधीचा योग्य व पारदर्शक वापर व्हावा, यासाठी प्राधान्याने प्रयत्न करेन.”
>
> - शंकर जगताप,
> **आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ**

# अभिषेक बारणेंचा थेरगावला ‘वनगंध’चा बूस्टर!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड शहराच्या वैभवात मानाचा तुरा रोवणारा आणि सौंदर्यात भर घालणारा ‘वनगंध’ हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प नागरिकांच्या भेटीला येत आहे. या प्रकल्पांतर्गत थेरगाव येथील बोट क्लब व केजुदेवी उद्यानाच्या नूतनीकरणाच्या कामाच्या नावामध्ये सुधारणा करून तिथे जलक्रीडा पर्यटन विकसित करण्यास स्थायी समितीने मंजुरी दिली आहे.**



स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या मान्यतेने या प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे. नुकतीच अभिषेक बारणे यांनी या प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करून प्रकल्प विकासाची सविस्तर माहिती घेतली. तसेच, संबंधित विभागाला आवश्यक त्या महत्त्वाच्या सूचना केल्या. या प्रकल्पाच्या पाहणी दौऱ्याप्रसंगी सिद्धेश्वर बारणे, 'मे. शिल्पी आर्किटेक्ट्स अँड प्लॅनर्स'चे वास्तुविशारद पारस एस. नेत्रगावकर हे देखील उपस्थित होते.

शहरातील नागरिकांना निसर्ग, पाणी आणि सार्वजनिक जीवनाशी जोडणारा सर्वसमावेशक परिसर या प्रकल्पातून निर्माण केला जात आहे. नदी नागरिकांसाठी खुली करणे आणि वनातून फेरफटका मारण्याचा अनुभव देणारे सार्वजनिक केंद्र निर्माण करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. या प्रकल्पाची रचना मनोरंजन, पर्यावरण आणि संस्कृती यांच्या मिलाफातून करण्यात आली असून, येथे येणाऱ्या नागरिकांसाठी भव्य प्रवेशद्वार, आगमन क्षेत्र आणि सुसज्ज पार्किंगची व्यवस्था असणार आहे.

या प्रकल्पाच्या मुख्य आकर्षणांमध्ये ॲम्फीथिएटर, समुदाय बैठक व्यवस्था, फोटो बूथ, मचान, तसेच बोटिंग जेट्टी, फेरी बोट आणि विविध जलक्रीडांचा (वॉटर स्पोर्ट्स) समावेश आहे. याशिवाय आरोग्य आणि विहारासाठी जॉगिंग ट्रॅक, मुलांचे खेळण्याचे क्षेत्र, निसर्गवाटा (नेचर ट्रेल्स), पुष्पोद्यान, इको पार्क, वॉच टॉवर, सांस्कृतिक उपक्रमांसाठी विशेष जागा, विलोभनीय घाट आणि एक मंदिर परिसर उभारला जाणार आहे.

निसर्ग सफर, विपुल हिरवाई आणि विविध सार्वजनिक उपक्रमांचा सुंदर मेळ या प्रकल्पात पाहायला मिळणार आहे. हा परिसर केवळ एक पारंपारिक उद्यान न राहता, नदी, निसर्ग आणि समाज यांच्यात निरंतर संवाद साधणारे एक चैतन्यपूर्ण शहरी केंद्र म्हणून आकार घेणार असून, लवकरात लवकर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

> "पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा आणि उत्तम विरंगुळा केंद्र उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. थेरगाव येथील ‘वनगंध’ प्रकल्पामुळे केवळ नदीचे सौंदर्य वाढणार नाही, तर याठिकाणी नागरिकांसाठी जलक्रीडा पर्यटनाचा एक नवीन आणि उत्कृष्ट पर्याय उपलब्ध होईल. हा प्रकल्प नदी, निसर्ग आणि समाज यांना जोडणारा एक आदर्श ठेवा ठरेल".
>
> - अभिषेक बारणे,
> **सभापती - स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# एस.पी.जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये जन्माष्टमी उत्साहात!

## दहीहंडीच्या जल्लोषात विद्यार्थ्यांनी अनुभवला भक्तीचा आनंद!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासह गणेशमूर्ती विसर्जनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाची आढावा बैठक पार पडली. गणेशोत्सव काळात नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि स्वच्छतेच्या दृष्टीने कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा आढावा उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी घेतला.**






कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या दहीहंडीच्या थरारक सोहळ्याने संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने एकमेकांच्या खांद्यावर खांदा देत मानवी मनोरे रचले आणि जल्लोषात दहीहंडी फोडली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी दाखविलेली शिस्त, समन्वय आणि एकजूट उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतली. दहीहंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संघभावना, एकता, परस्पर सहकार्य, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वासाचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवता आले. पारंपरिक सणाला शैक्षणिक आणि संस्कारक्षम उपक्रमाची जोड देत विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक मूल्यांची रुजवणूक करण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नाना पांडुरंग गवळी, सुनितामाई पांडुरंग गवळी, स्वप्नील पांडुरंग गवळी, कोमल स्वप्नील गवळी आणि संकल्प पांडुरंग गवळी यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड, सुप्रिया मुळे आणि तैसीन मुलाणी यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची शिस्तबद्ध आखणी, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि विविध उपक्रमांमुळे संपूर्ण सोहळ्याला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या वैशाली यादव यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे आणि उत्स्फूर्त सहभागाचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच सांस्कृतिक आणि पारंपरिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा, असे त्यांनी यावेळी सांगितले. वर्षा गुरमे आणि प्रियांका गावंडे यांनी प्रभावी सूत्रसंचालन करत कार्यक्रमातील प्रत्येक क्षणाला रंगत आणली.

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, प्रशासन आणि विद्यार्थ्यांनी घेतलेल्या अथक परिश्रमामुळे दहीहंडी उत्सवाचा हा सोहळा अत्यंत देखणा आणि संस्मरणीय ठरला. पारंपरिक उत्सवातून विद्यार्थ्यांना एकता, बंधुभाव, सहकार्य आणि सकारात्मक विचारांचा संदेश देण्यात आला. सत्य, प्रेम, भक्ती आणि सदाचाराच्या मूल्यांची जपणूक करण्याचे आवाहन करत या आनंदोत्सवाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली.

# एस.पी.जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**एस.पी.जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक दिन अत्यंत उत्साहपूर्ण, आनंददायी आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. नाना पांडुरंग गवळी व सुनीतामाई पांडुरंग गवळी, स्वप्नील पांडुरंग गवळी, कोमल पांडुरंग गवळी आणि मा. संकल्प पांडुरंग गवळी यांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.**












शिक्षक दिनाचे औचित्य साधून शाळेतील इयत्ता ५वी व १०वीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत वर्गांमध्ये विविध विषयांचे अध्यापन केले. शाळेचे व्यवस्थापक स्वप्नील सर व कोमल मॅडम, मुख्याध्यापक डॉ. प्रवीण गायकवाड सर व तैसीन मुलानी मॅडम, समन्वयक सुप्रिया मुळे व रुपाली मॅडम लेखा विभागातील एकता जाधव व निशा वाघमारे, तसेच क्रीडा शिक्षक विकी सर आणि संगणक शिक्षिका प्रेरणा मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हा भूमिका-अभिनय (रोल प्ले) यशस्वीरीत्या पार पाडला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षकांचे परिश्रम, संयम आणि जबाबदाऱ्यांचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवता आले, ज्यामुळे त्यांच्यातील नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि शिक्षकांविषयीचा आदरभाव अधिक दृढ झाला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्नेहांकिता चव्हाण आणि इयत्ता ५वीच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने आणि प्रभावीपणे हाताळले, ज्यामुळे संपूर्ण कार्यक्रमाची रंगत अधिक वाढली. या वेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयीची कृतज्ञता व्यक्त करणारी गीते, सुविचार, नृत्य आणि विविध मनोरंजक सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा सोहळा अत्यंत देखणा व अविस्मरणीय ठरला. शेवटी, शिक्षकांचे समर्पण आणि विद्यार्थ्यांचा आदर यांचा सुंदर संगम दाखवून देणारा हा शिक्षक दिन सर्वांसाठीच प्रेरणादायी ठरला.

# ॲपेक्स स्कूलमध्ये शिक्षकांचा जल्लोषात सन्मान!

## विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारातून गुरुजनांचा गौरव; शिक्षक दिन उत्साहात!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**गुरु-शिष्याच्या पवित्र नात्याचा सन्मान आणि शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या भावनेतून चऱ्होली येथील ‘ॲपेक्स स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेज’मध्ये शिक्षक दिन अत्यंत उत्साहात आणि भारावलेल्या वातावरणात साजरा झाला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व पूजनाने झाली.**






या प्रसंगी शाळेचे संस्थापक संतोष काळजे, दत्तात्रय वाळके, गणेश ठोकळ, राहुल टोणगे, मुख्याध्यापिका डॉ. मानसी पंडीत गिल, उपमुख्याध्यापिका लीना तुगडे, विभागप्रमुख नीलम टोणगे आणि बालवाटिका विभागप्रमुख कोमल कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते शिक्षकांचा सन्मानपूर्वक सत्कार करून त्यांच्या समर्पित सेवेचा गौरव करण्यात आला.

शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वैविध्यपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. शिक्षकांचे महत्त्व, गुरु-शिष्याचे नाते आणि शिक्षणाचे जीवनातील स्थान अधोरेखित करणाऱ्या नाटिका, एकल गीते, नृत्याविष्कार आणि भाषणे विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावीपणे सादर केली. सोनम वांगचूक यांच्या जीवनकार्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेला प्रेरणादायी अभिनय आणि शिक्षकांसाठी तयार केलेला खास 'सरप्राईज व्हिडिओ' या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. याशिवाय विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी ‘चुकीची उत्तरे’, ‘फुगे फोडणे’ आणि ‘गीत ओळखा’ यांसारख्या विविध मनोरंजक खेळांचे आयोजन केले होते, ज्यामध्ये शिक्षकांनीही मनसोक्त सहभाग नोंदवून आनंद लुटला.

कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना संस्थापक गणेश ठोकळ व राहुल टोणगे यांनी समाज व विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान अमूल्य असल्याचे सांगत सर्वांना शुभेच्छा दिल्या.

मुख्याध्यापिका डॉ. मानसी पंडीत गिल यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या दोघांचीही भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद करत संपूर्ण चमूचे कौतुक केले. विद्यार्थ्यांचे निरागस प्रेम, विविध कलाविष्कारातून व्यक्त झालेली कृतज्ञता आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा शिक्षक दिन सोहळा सर्वांसाठीच अविस्मरणीय ठरला.

## एक दिवस विद्यार्थी बनले ‘साहेब’; प्राचार्यांपासून प्राध्यापकांपर्यंत पदभार सांभाळला!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**शिक्षक दिनाचे औचित्य साधून चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज या महाविद्यालयात ‘एक दिवस विद्यार्थ्यांचा’ हा अनोखा उपक्रम उत्साहात राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी प्राचार्या, उपप्राचार्या आणि प्राध्यापकांची भूमिका पार पाडली.**



डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर महाविद्यालयात हा उपक्रम घेण्यात आला. सकाळी संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा यांच्या हस्ते निवड झालेल्या विद्यार्थ्यांकडे पदभार सोपवण्यात आला.

यामध्ये कु. मुस्कान शेख हिने एक दिवसाची प्राचार्या, कु. जेसिका शर्मा हिने उपप्राचार्या, तर ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी विविध विभागांचे प्राध्यापक म्हणून काम पाहिले. विद्यार्थी प्राध्यापकांनी वर्गावर जाऊन तासिका घेतल्या, प्रात्यक्षिके घेतली आणि विद्यार्थ्यांच्या शंका सोडवल्या. तर विद्यार्थी प्राचार्यांनी दिवसभर महाविद्यालयाचे प्रशासन, शिस्त आणि शैक्षणिक कामकाजाचे नियोजन पाहिले.

आपल्या मनोगतात विद्यार्थी प्राचार्या मुस्कान शेख म्हणाली, “एक दिवस जरी असले तरी प्राचार्य पदाची जबाबदारी किती मोठी आहे, हे आज समजले. प्राध्यापकांना वर्ग सांभाळताना किती मेहनत घ्यावी लागते, याची जाणीव झाली.” यावेळी विद्यार्थी प्राध्यापकांनीही आपल्या भावना व्यक्त करत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, उपप्राचार्या डॉ. जयश्री मुळे, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, स्टाफ अकॅडमीच्या समन्वयिका डॉ. जयश्री कांबळे, प्रा. स्नेहल वऱ्हाडे यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन विद्यार्थी प्राध्यापकांचा खास सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी यांनी शिक्षकांचे महत्त्व विषद केले, तर मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया यांनी आपल्या कारकिर्दीतील अनुभव सांगून मार्गदर्शन केले. भविष्यात आदर्श शिक्षकी पेशा स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी शिक्षक झालेल्या विद्यार्थ्यांना केले. “तुमच्यात आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, विद्यार्थ्यांप्रती आदर हे गुण असतील तर ते अंगीकारून शिक्षकी पेशा भविष्यात स्वीकारावा. कारण शिक्षक हा एक पिढी घडवत असतो. चांगल्या शिक्षकांची आजही खूप गरज आहे,” असे त्यांनी सांगितले. तसेच नुकताच आदर्श शिक्षक म्हणून गौरविण्यात आलेल्या महाराष्ट्रातील डॉ. कविता गित्ते, सीमा शिंदे, कुंदा बच्छाव यांची सखोल माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

समारोप प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य व गणेश वंदना सादर केली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत प्रियंका गंगावणे यांनी केले, सूत्रसंचालन विद्यार्थिनी सरस्वती जोशी हिने केले, तर आभार विद्यार्थी उपप्राचार्या जेसिका शर्मा हिने मानले. यावेळी सर्व विभागप्रमुख, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माई काटेंच्या पुढाकाराने दापोडीच्या विकासाला 'बूस्टर'!

## विविध विकासकामांबाबत चर्चा; प्रलंबित कामांना गती देण्यासाठी नियोजन!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**दापोडी परिसराचा सर्वांगीण आणि नियोजनबद्ध विकास व्हावा, नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या विकासकामांना गती मिळावी, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगरसेविका स्वाती उर्फ माई काटे यांनी पुढाकार घेतला आहे. परिसरातील विविध महत्त्वाच्या विकासकामांसंदर्भात संबंधित पातळीवर सकारात्मक चर्चा करून कामांच्या पुढील नियोजनावर भर देण्यात आला.दापोडीतील महापुरुषांच्या स्मारकांचा विकास, नवीन पाण्याची टाकी, नदीपात्राच्या संरक्षणासाठी संरक्षक भिंत, स्मशानभूमी व दफनभूमीचा विकास, हुतात्मा भगतसिंग शाळेचा विकास यांसारख्या महत्त्वाच्या कामांचा यामध्ये समावेश आहे.**




> "दापोडीचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजांपासून ते शिक्षण, आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक सुविधा, महापुरुषांच्या स्मारकांचा विकास आणि दर्जेदार रस्त्यांपर्यंत प्रत्येक कामाला गती देण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. केवळ आश्वासने नव्हे, तर नियोजनबद्ध विकासकामांच्या माध्यमातून दापोडीचा चेहरामोहरा बदलण्याचा आमचा संकल्प आहे. नागरिकांचा विश्वास आणि सहकार्य हीच आमच्या कामाची खरी ताकद आहे."
>
> **- स्वाती उर्फ माई काटे,**
> **नगरसेविका, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

नागरिकांच्या आरोग्य आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या दृष्टीने दवाखाना, जिम आणि विरंगुळा केंद्र, तर सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी सांस्कृतिक भवन आणि प्रशासकीय इमारतीच्या उभारणीबाबतही चर्चा करण्यात आली. लहान मुले, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी गार्डन, स्विमिंग पूल आणि प्लेग्राउंड यांसारख्या सुविधा विकसित करण्यावरही भर देण्यात आला आहे.

पावसाळ्यात नागरिकांना होणाऱ्या त्रासावर कायमस्वरूपी उपाय करण्याच्या दृष्टीने ड्रेनेज आणि स्टॉर्म वॉटर लाईनची कामे, तसेच अंतर्गत व प्रमुख रस्त्यांच्या दर्जेदार विकासासाठी काँक्रीट रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देण्याबाबत नियोजन करण्यात आले.विशेषतः गणेश नगर ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, बोपोडी पूल, एसटी रोड ते फुगेवाडी या महत्त्वाच्या मार्गावर सिमेंट काँक्रीट रस्ता विकसित करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. हा मार्ग विकसित झाल्यास परिसरातील वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

सिद्धार्थ नगर, प्रभाग क्रमांक ३० येथील जुने व अर्धवट अवस्थेतील शौचालय असलेली जागा मोकळी करून त्या ठिकाणी नवीन भवन उभारण्याचेही नियोजन करण्यात आले आहे.

त्यामुळे या जागेचा नागरिकांच्या उपयोगासाठी अधिक चांगल्या पद्धतीने वापर होणार आहे. दरम्यान, दापोडी येथे तलाठी कार्यालयासाठी जागा उपलब्ध झाल्याबद्दल दिवंगत उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार साहेब, महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष तथा पिंपरी विधानसभा आमदार मा. अण्णासाहेब बनसोडे, तसेच महापालिका आयुक्त आणि संबंधित अधिकारीवर्गाबद्दल स्वाती उर्फ माई काटे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. "दापोडीचा विकास हा केवळ काही रस्ते किंवा इमारतींपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रत्येक सुविधा सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक सुविधा आणि महापुरुषांच्या स्मारकांचा विकास या सर्व कामांचा सातत्याने पाठपुरावा करून दापोडीला अधिक सुंदर, सुरक्षित आणि सुविधासंपन्न बनविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत," असे नगरसेविका स्वाती उर्फ माई काटे यांनी सांगितले.

---

# बिजलीनगर सबस्टेशनमध्ये मोठा स्फोट; पिंपरी-चिंचवडचा वीजपुरवठा ठप्प!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**बिजलीनगर येथील महावितरणच्या सबस्टेशनमध्ये मोठा स्फोट झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या स्फोटामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, खबरदारीचा उपाय म्हणून शहरातील अनेक भागांचा वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. चिंचवड, पिंपरी, थेरगाव, काळेवाडी, रहाटणी, पिंपळे सौदागर यांसह लगतच्या परिसरातील वीजपुरवठ्यावर या घटनेचा मोठा परिणाम झाला आहे. अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.**



सबस्टेशनमध्ये अचानक मोठा स्फोट झाल्याने महावितरणच्या यंत्रणेत एकच धावपळ उडाली. घटनेची माहिती मिळताच संबंधित अधिकारी आणि तांत्रिक पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्फोटानंतर सुरक्षेच्या दृष्टीने सबस्टेशनमधील वीजपुरवठा नियंत्रित करण्यात आला. त्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित भागातील वीजपुरवठाही बंद ठेवण्यात आला. अचानक झालेल्या या वीजखंडिततेमुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक नागरिकांनी वीजपुरवठा बंद होण्याचे कारण जाणून घेण्यासाठी महावितरणकडे चौकशी सुरू केली.

वीजपुरवठा खंडित झाल्याने घरगुती ग्राहकांसह दुकानदार, व्यावसायिक, कार्यालये तसेच विविध आस्थापनांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. अनेक ठिकाणी दैनंदिन कामकाजासाठी लागणारी विद्युत उपकरणे बंद पडल्याने कामावर परिणाम झाला आहे. विशेषतः संगणक, प्रिंटर, सर्व्हर, एसी, पाण्याच्या मोटारी तसेच इतर विद्युत उपकरणांवर अवलंबून असलेल्या आस्थापनांचे कामकाज विस्कळीत झाले आहे. त्यामुळे वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्याची मागणी नागरिक आणि व्यावसायिकांकडून केली जात आहे.

दरम्यान, हा स्फोट नेमका कशामुळे झाला, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सबस्टेशनमधील तांत्रिक बिघाड, विद्युत यंत्रणेतील काही समस्या, अतिरिक्त भार किंवा अन्य कोणत्या कारणामुळे ही घटना घडली का, याबाबत महावितरणकडून अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. स्फोटानंतर निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता संबंधित यंत्रणेची बारकाईने तपासणी करण्यात येत आहे. तांत्रिक पथकाकडून बिघाडाचा नेमका स्रोत शोधण्याचे काम सुरू असून, त्यानंतरच स्फोटाचे कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

या घटनेमुळे चिंचवड आणि परिसरातील दैनंदिन व्यवहारांवरही मोठा परिणाम झाला आहे. वीजेवर अवलंबून असलेल्या व्यावसायिकांना कामकाजात अडथळे निर्माण झाले असून, घरगुती ग्राहकांनाही वीजपुरवठा बंद असल्याने विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. नागरिकांकडून सातत्याने वीजपुरवठा पूर्ववत होण्याबाबत माहिती घेतली जात आहे. अचानक वीज गेल्याने काही भागांमध्ये पाणीपुरवठा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मोटारींच्या कामावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

वीजपुरवठा बंद असल्याने काही भागांमध्ये नागरिकांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत असून, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि घरातून काम करणाऱ्या नागरिकांचीही गैरसोय होत आहे. त्याचबरोबर दुकाने, कार्यालये आणि व्यावसायिक आस्थापनांमधील कामकाजावर त्याचा थेट परिणाम झाला आहे. वीजपुरवठा दीर्घकाळ बंद राहिल्यास व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे.

महावितरणच्या संबंधित पथकाकडून दुरुस्ती आणि तांत्रिक तपासणीचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. स्फोटामुळे बाधित झालेल्या यंत्रणेची पाहणी करून सुरक्षित पद्धतीने दुरुस्तीचे काम करण्यात येत आहे. मात्र, सबस्टेशनमधील परिस्थिती आणि बिघाडाचे स्वरूप लक्षात घेता वीजपुरवठा नेमका किती वेळात सुरळीत होईल, याबाबत अद्याप निश्चित वेळ जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांचे लक्ष आता महावितरणच्या अधिकृत अपडेटकडे लागले आहे.

स्फोटाचे नेमके कारण, दुरुस्तीची सद्यस्थिती आणि वीजपुरवठा पूर्ववत करण्याबाबत महावितरणकडून अधिकृत माहिती मिळाल्यानंतरच संपूर्ण परिस्थिती स्पष्ट होणार आहे. संबंधित पथकाकडून काम पूर्ण झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने वीजपुरवठा सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.